

# पुष्पावती विद्यालय येथे सायबर सुरक्षिततेवर माहितीपर व्याख्यानाचे आयोजन

ओतूर (दैनिक संध्या) : बी.जे.महाविद्यालय व क्विक हिल फाउंडेशनच्या संयुक्त विद्यमाने राबवित असलेल्या सायबर "शिक्षा फॉर सायबर सुरक्षा" या प्रकल्पांतर्गत महाविद्यालयातील विद्यार्थिनी गौरी भालेराव व वैष्णवी डुंबरे यांनी पुष्पावती विद्यालयातील विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षा विषयी माहिती देऊन सायबर जगतात सुरक्षित राहण्यासाठी आवश्यक बाबींची ओळख करून दिली. सदर विद्यार्थिनींनी विद्यार्थ्यांना माहिती तंत्रज्ञानाच्या युगात मोबाईलचा वापर व इंटरनेटचा वापर करताना काय काळजी घेतली पाहिजे हे उदाहरणासह समजून सांगितले. या विद्यार्थिनींच्या कामाचे मुख्याध्यापक अकोलकर सर यांनी कौतुक केले व विद्यार्थिनींना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या त्याचप्रमाणे असे स्तुत्य उपक्रम क्विक हिल फाउंडेशन व बी.जे. महाविद्यालय राबवत आहे याबद्दल दोन्हीही आस्थापनांचे देखील मुख्याध्यापकांनी कौतुक केले.